**MHAU070052962025**

<u>किरकोळ अर्ज क्र.४६५/२०२५ मधील निशाणी १ वरील आदेश</u>
रंजना व ईतर वि. सरकार

अर्जदार यांनी हा अर्ज वारसप्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी केला आहे.

२. अर्जदारांचे प्रकरण असे की :

मयत अंकुश श्रीपती किर्तीशाही हे मांजरी, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद येथील रहीवासी होते. मयत अंकुश श्रीपती किर्तीशाही यांच्या नावे शेत जमीन गट नं.१८५, एकुण क्षेत्र २ हेक्टर ४५ आर जमीन मौजे मांजरी, ता. गंगापूर, जि.औरंगाबाद (संक्षेपात 'अर्ज मिळकत') येथे स्थावर मिळकत आहे.

३. मयत अंकुश श्रीपती किर्तीशाही यांचा मृत्यु दि.१५/०३/२०१४ रोजी झालेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत अंकुश श्रीपती किर्तीशाही यांच्या मुली असुन अर्जदार क्र.४ ही त्यांची पत्नी आहे. अंकुश श्रीपती किर्तीशाही यांच्या पश्चात <u>अर्जदार क्र.१ ते ४</u> हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. करिता प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदारांनी उपरोक्त मिळकत नावावर करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे व प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

४. अभिलेखानुसार, नि. वर अर्जदारपक्षाने 'लोकमत' वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द दिनांक ०९.०९.२०२५ रोजीचे जाहिर नोटीस प्रत दाखल केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय येथे जाहीर नोटीस बजावण्यासाठी जारी केली असता तसेच न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर

जाहीर नोटीस डकवण्यासाठी ती जारी केली असता प्रस्तुत प्रकरणासंबंधी ३० दिवसांच्या आत आक्षेप मागविण्यात आले, परंतु, आतापर्यंत कुणाचा काही आक्षेप आलेला नसल्याचे अभिलेखावरुन आढळते.

५. अर्जापुष्ठ्यर्थ अर्जदार क्र. १ यांनी ऑनलाईन साक्षशपथपत्र नि.९ वर दाखल केले असून अर्जकथने पुनरुच्चारित केली आहेत. याशिवाय अर्जदारांनी खालील कागदपत्रे दाखल केले आहेत -

नि.१० वर मयत अंकुश श्रीपती किर्तीशाही यांचे मृत्यु प्रमाणपत्र,

नि.११ वर गट नं.१८५ चा ७/१२ उतारा,

नि.१२ वर गट नं.१८५ चे मुल्यांकनपत्र,

नि.१४ ते १७ वर अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या आधारकार्डची प्रत,

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता आजपावेतो अर्जदारांच्या अर्जास कोणाचाही आक्षेप आलेला नाही. त्यायोगे सदर अर्जदार हे वारस असल्याची बाब अविवादित राहिल्याचे आढळुन येते.

७. उपरोक्त सर्व बाबींचे एकत्रित अवलोकन केले असता, अर्जदार क्र.१ रंजना भिकुलाल कुलकर्णी, अर्जदार क्र.२ शोभा पोपट सातुरे, अर्जदार क्र.३ सुमन संजय त्रिभुवन व अर्जदार क्र.४ मंजुळा अंकुश किर्तीशाही हे मयत अंकुश श्रीपती किर्तीशाही यांचे वारस असल्याचे दिसुन येते. सबब, त्यांच्या नावे वारसप्रमाणपत्र (Heirship Certificate) जारी करणे उचित होईल. सबब, आदेश -

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ रंजना भिकुलाल कुलकर्णी, अर्जदार क्र.२ शोभा पोपट सातुरे, अर्जदार क्र. सुमन संजय त्रिभुवन व अर्जदार क्र.४ मंजुळा अंकुश किर्तीशाही हे मयत अंकुश श्रीपती किर्तीशाही यांचे कायदेशिर वारस असल्याचे निष्कर्षीत करण्यात येते.

३. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या नावे अर्ज मिळकतीबाबतचे **(**परीच्छेद क्र**.**३ मधील विस्तृत वर्णन**)** वारसप्रमाणपत्र (Heirship Certificate) आवश्यक ते कोर्ट फी/शुल्क जमा केल्यानंतर जारी करण्यात यावे.

Digitally signed by NILESH RAJARAM INDALKAR
Date: 2026.03.18 13:56:38 +0530

दि.१८/०३/२०२६

(निलेश रा. इंदलकर)
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर,
औरंगाबाद